# नवी मुंबई महानगरपालिका

## मा.प्रशासक तथा आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका

**सोमवार, दिनांक २३ नोव्हेंबर २०२० रोजी भरलेल्या सभेतील मंजुर/नामंजूर इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसूदा स्वरुपात खालीलप्रमाणे आहे:-**

| | |
|---|---|
| विषय क्र.०१.<br>दि. २३ नोव्हेंबर, २०२० | ऐरोली से. ०३ भारत बिजली अंडरपास येथील रस्त्याचे रुंदीकरण करणे कल्व्हंट बांधणे व तत्सम कामे करणे या कामातील जादा, अतिरिक्त व बचत बाबींच्या (Excess, Extra/Saving) खर्चास मंजुरी मिळणेबाबत, आयुक्तांचे दिनांक २३/११/२०२०, चे पत्र जा. क्र. नमुंमपा/श.अ./१९२९/२०२०. |
| ठराव क्र.३३९ | "उपरोक्त संदर्भात ऐरोली से. ०३ भारत बिजली अंडरपास येथील रस्त्याचे रुंदीकरण करणे कल्व्हंट बांधणे व तत्सम कामे करणे या कामातील जादा, अतिरिक्त व बचत बाबींच्या (Excess, Extra/Saving) खर्चास मंजुरी मिळणेबाबत, प्रस्तावित केल्याप्रमाणे सदर कामाच्या जादा बाबी व अतिरिक्त बाबी मिळुन होणा-या रक्कम रुपये २,८६,२७,५७१/- ( अक्षरी रक्कम दोन कोटी श्याऐंशी लक्ष सत्तावीस हजार पाचशे एक्काहत्तर मात्र ) इतक्या सुधारित प्रशासकीय खर्चास प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह मा. प्रशासक यांची मंजूरी देण्यात यावी.” |
| निर्णय : | ठराव करण्यात येतो की,<br>ऐरोली से. ०३ भारत बिजली अंडरपास येथील रस्त्याचे रुंदीकरण करणे कल्व्हंट बांधणे व तत्सम कामे करणे या कामातील जादा, अतिरिक्त व बचत बाबींच्या (Excess, Extra/Saving) खर्चास मंजुरी मिळणेबाबत, सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले आहे.<br>त्यानुसार विषय क्रमांक ०१ ठराव क्रमांक ३३९ अन्वये प्रस्तावित केल्याप्रमाणे सदर कामाच्या जादा बाबी व अतिरिक्त बाबी मिळुन होणा-या रक्कम रुपये २,८६,२७,५७१/- ( अक्षरी रक्कम दोन कोटी श्याऐंशी लक्ष सत्तावीस हजार पाचशे एक्काहत्तर मात्र ) इतक्या सुधारित प्रशासकीय खर्चास प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह मा. प्रशासक यांची मंजूरी देण्यात येत आहे. |

**सही/-**
(चित्रा बाविस्कर)
नगरसचिव
नवी मुंबई महानगरपालिका

**सही/-**
(अभिजीत बांगर)
आयुक्त तथा प्रशासक
नवी मुंबई महानगरपालिका

| | |
|---|---|
| विषय क्र.०२.<br>दि. २३ नोव्हेंबर, २०२० | वाशी विभागातील सेक्टर-९ भाग व १० येथील अंतर्गत रस्त्याची डांबरीकरणाने सुधारणा करणे, आयुक्तांचे दिनांक २३/११/२०२०, चे पत्र जा. क्र. नमुंमपा/श.अ./१९३१/२०२०. |
| ठराव क्र.३४० | "उपरोक्त संदर्भात वाशी विभागातील सेक्टर-९ भाग व १० येथील अंतर्गत रस्त्याची डांबरीकरणाने सुधारणा करणे, प्रस्तावित केल्याप्रमाणे मे. क्लासिक कन्स्ट्रक्शन्स या कंत्राटदाराबरोबर अंदाजपत्रकीय रक्कम रुपये १,७४,२३,९५९/- (+ रुपये २०,९०,८७५/- जी.एस.टी.) पेक्षा २% कमी म्हणजेच रक्कम रुपये १,७०,७५,४८०/- अधिक जीएसटी रुपये २०,४९,०५८/- सह एकत्रित रक्कम रुपये १,९१,२४,५३८/- (अक्षरी रक्कम रुपये एक कोटी एक्क्याण्णव लक्ष चोवीस हजार पाचशे अडतीस मात्र ) इतक्या खर्चाचे कंत्राट करण्यास प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १९४९ च्या कलम ७३(क) अन्वये मा. प्रशासक यांची संमती देण्यात यावी.” |
| निर्णय : | ठराव करण्यात येतो की,<br>वाशी विभागातील सेक्टर-९ भाग व १० येथील अंतर्गत रस्त्याची डांबरीकरणाने सुधारणा करणे, सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले आहे.<br>त्यानुसार विषय क्रमांक ०२ ठराव क्रमांक ३४० प्रस्तावित केल्याप्रमाणे मे. क्लासिक कन्स्ट्रक्शन्स या कंत्राटदाराबरोबर अंदाजपत्रकीय रक्कम रुपये १,७४,२३,९५९/- (+ रुपये २०,९०,८७५/- जी.एस.टी.) पेक्षा २% कमी म्हणजेच रक्कम रुपये १,७०,७५,४८०/- अधिक जीएसटी रुपये २०,४९,०५८/- सह एकत्रित रक्कम रुपये १,९१,२४,५३८/- (अक्षरी रक्कम रुपये एक कोटी एक्क्याण्णव लक्ष चोवीस हजार पाचशे अडतीस मात्र ) इतक्या खर्चाचे कंत्राट करण्यास प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १९४९ च्या कलम ७३(क) अन्वये मा. प्रशासक यांची संमती देण्यात येत आहे. |

**सही/-**
(चित्रा बाविस्कर)
नगरसचिव
नवी मुंबई महानगरपालिका

**सही/-**
(अभिजीत बांगर)
आयुक्त तथा प्रशासक
नवी मुंबई महानगरपालिका

| | |
|---|---|
| विषय क्र.०३.<br>दि. २३ नोव्हेंबर, २०२० | वाशी सेक्टर-१०ए येथील मिनाताई ठाकरे उद्यानात बुकझानिया थीम पार्क विकसित करणे, आयुक्तांचे दिनांक २३/११/२०२०, चे पत्र जा. क्र. नमुंमपा/श.अ./१९३०/२०२०. |
| ठराव क्र.३४१ | "उपरोक्त संदर्भात वाशी वाशी सेक्टर-१०ए येथील मिनाताई ठाकरे उद्यानात बुकझानिया थीम पार्क विकसित करणे, प्रस्तावित केल्याप्रमाणे मे. अक्षता एंटरप्रायजेस या कंत्राटदाराबरोबर अंदाजपत्रकीय रक्कम रुपये १,४३,७७,२५६/- अधिक जी.एस.टी.(रुपये ८,४६,२११/- GST १२% on Civil & Electrical Item ) सह एकत्रित रक्कम रुपये १,५२,२३,४६७/- (अक्षरी रक्कम रुपये एक कोटी बावन्न लक्ष तेवीस हजार चारशे सदुसष्ठ मात्र ) इतक्या खर्चाचे कंत्राट करण्यास प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १९४९ च्या कलम ७३(क) अन्वये मा. प्रशासक यांची संमती देण्यात यावी." |
| निर्णय : | ठराव करण्यात येतो की,<br>वाशी वाशी सेक्टर-१०ए येथील मिनाताई ठाकरे उद्यानात बुकझानिया थीम पार्क विकसित करणे, सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले आहे.<br>त्यानुसार विषय क्रमांक ०३ ठराव क्रमांक ३४१ प्रस्तावित केल्याप्रमाणे मे. अक्षता एंटरप्रायजेस या कंत्राटदाराबरोबर अंदाजपत्रकीय रक्कम रुपये १,४३,७७,२५६/- अधिक जी.एस.टी.(रुपये ८,४६,२११/- GST १२% on Civil & Electrical Item ) सह एकत्रित रक्कम रुपये १,५२,२३,४६७/- (अक्षरी रक्कम रुपये एक कोटी बावन्न लक्ष तेवीस हजार चारशे सदुसष्ठ मात्र ) इतक्या खर्चाचे कंत्राट करण्यास प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १९४९ च्या कलम ७३(क) अन्वये मा. प्रशासक यांची संमती देण्यात येत आहे. |

**सही/-**
(चित्रा बाविस्कर)
नगरसचिव
नवी मुंबई महानगरपालिका

**सही/-**
(अभिजीत बांगर)
आयुक्त तथा प्रशासक
नवी मुंबई महानगरपालिका

| | |
|---|---|
| **विषय क्र.०४.<br>दि. २३ नोव्हेंबर, २०२०** | **नवी मुंबई महानगरपालिकेची प्रारुप विकास योजना २०१८-२०३८ महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २६(१) अन्वये उक्त विकास योजना प्रसिध्द करण्यासाठी १ वर्ष मुदतवाढीचा प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत, आयुक्तांचे दिनांक २३/११/२०२०, चे पत्र जा. क्र. नमुंमपा/नरवि/ससंनर/१२/२०२०.** |

**ठराव क्र.३४२**

**"उपरोक्त संदर्भात नवी मुंबई महानगरपालिकेची प्रारुप विकास योजना २०१८-२०३८ महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २६(१) अन्वये उक्त विकास योजना प्रसिध्द करण्यासाठी १ वर्ष मुदतवाढीचा प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत, प्रस्तावित केल्याप्रमाणे** नवी मुंबई महानगरपालिकेची स्थापना दि.०१/०१/१९९२ पासून झालेली असून या महानगरपालिका क्षेत्रासाठी सिडकोची तत्कालीन विकास योजना, जी शासनाने दि.१८/०८/१९७९ व दि.१८/०१/१९८० रोजी मंजूर करुन दि.०१/०३/१९८० पासून अंमलात आलेली आहे, ती लागू आहे. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात उक्त विकास योजनेतील २९ महसूली गावे व या विकास योजनेत समाविष्ट नसलेले केवळ अडवली-भुतावली हे एकमेव महसूली गाव असे एकूण ३० महसूली गावे समाविष्ट आहे.

०२. सबब, या २९ गावांसाठी लागू असलेली मंजूर विकास योजना सुधारित करणे व नव्याने अंतर्भुत केलेल्या अडवली-भुतावली या गावांची विकास योजना नव्याने हाती घेणे याबाबत (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त विकास योजना" असा करण्यात येईल) निर्णय महानगरपालिकेने त्यांचेकडील ठराव क्र. १८५०, दि.२४/०७/२०१७ अन्वये घेवून त्याबाबतचा इरादा हा महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात येईल) कलम २३(१) (कलम ३८ सह) अन्वये दि.१४/१२/२०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आलेला होता. सदर इरादा हा शासन राजपत्रात देखील दि.१५/१२/२०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आलेला होता. उक्त अधिनियमाच्या कलम २६(१) अन्वये उक्त विकास योजना हि तयार करुन, कलम २३(१) अन्वये इरादा झाल्याच्या तारखेपासून २ वर्षात अधिक शासनाकडून १ वर्षाची मुदत वाढ मंजूर करुन घेणे यांसह कमाल ३ वर्षापर्यंत, कलम २६(१) अन्वये जनतेकडून सूचना / हरकती मागविण्यासाठी प्रसिध्द करणे आवश्यक आहे. उक्त अधिनियमाच्या १४८अे मध्ये शासनाने दि.१४/०९/२०२० च्या अधिसूचनेद्वारे केलेल्या सुधारणेनुसार पाहता **"या अधिनियमाचे प्रकरण दोन, तीन, चार आणि पाच खालील कोणत्याही विकास आराखडा, क्षेत्रीय आराखडा, किंवा योजना यांचा कालावधीची गणना करतील असा / असे कालावधीची कोणत्याही न्यायालयाच्या आदेशामुळे गेलेला कालावधी [२](किंवा भारताच्या निवडणूक आयोगाच्या किंवा राज्य निवडणूक आयोगाच्या आचारसंहितेचा अंमलबजावणीचा कालावधी. किंवा देशामध्ये किंवा राज्यामध्ये उद्भवणाऱ्या कोणत्याही महामारीच्या किंवा साथीच्या रोगांच्या फैलावास किंवा आपत्तीजन्य परिस्थितीस प्रतिबंध करण्याकरीता, भारत सरकारने, किंवा, यथास्थित, राज्य सरकारने केलेल्या कोणत्याही मार्गदर्शक तत्वांच्या किंवा टाळेबंदी उपाययोजनांचा अंमलबजावणीचा कालावधी) यातून वगळण्यात येईल.)"**. सदर सुधारणा दि.२३/०३/२०२० पासून पुर्वलक्षी प्रभावाने अंमलात आलेली आहे.

०३. उक्त कलम १४८अे ची तरतूद पाहता, उक्त विकास योजनेतील वैधानिक कार्यवाही करावयाच्या कालावधीमधून लोकसभा निवडणूक, २०१९ चा आचारसंहिता कालावधी (दि.१०/०३/२०१९ ते दि.२६/०५/२०१९ – ७९ दिवस), विधानसभा निवडणूक, २०१९ चा आचारसंहिता कालावधी (दि.२१/०९/२०१९ ते दि.२७/१०/२०१९-३७ दिवस) व कोविड-१९ विषाणू टाळेबंदीचा कालावधी २५३दिवस (दि.२३/०३/२०२० ते दि.३०/११/२०२० पर्यंत) असा एकूण ७९ + ३७ + २५३ = ३६९ दिवसांचा कालावधी वगळणे आवश्यक आहे. हा ३६९ दिवसांचा कालावधी विचारात घेतला तर कलम २६(१) अन्वये उक्त विकास योजना हि २ वर्षाच्या आत म्हणजे दि.१५/१२/२०१७ पासून २ वर्षे म्हणजेच दि.१५/१२/२०१९ पासून पुढे ३६९ दिवस म्हणजेच दि.१८/१२/२०२० पुर्वी प्रसिध्द करणे आवश्यक आहे. त्याशिवाय शासनाच्या पुर्वमंजूरीने दि.१८/१२/२०२० च्या पुढे १ वर्षे म्हणजेच दि.१८/१२/२०२१ पुर्वी जनतेकडून सूचना / हरकती मागविण्यासाठी प्रसिध्द करणे आवश्यक आहे.

०४. वर नमूद केल्याप्रमाणे दि.१८/१२/२०२० पुर्वी सदर विकास योजना हि कलम २६(१) अन्वये प्रसिध्द करणे खालील कारणास्तव शक्य होणार नाही, असे नगर रचना अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगर रचना, नवी मुंबई महानगरपालिका यांनी संदर्भ क्र. २ अन्वये निदर्शनास आणून दिलेले आहे.

(अ) महासभेचा उक्त विकास योजना प्रसिध्दीसाठी अर्थात जनतेकडून सूचना / हरकती मागविण्यासाठी प्रसिध्द करण्यासाठीचा मंजूर ठराव महापालिका सचिव यांच्याकडून नगररचना विभागास दि.२८/०२/२०२० रोजी प्राप्त झालेला आहे.

(ब) महासभेने उक्त ठरावाद्वारे मोठ्या प्रमाणात अर्थात एकूण २२६ नविन बदल विकास योजनेत सुचविलेले असून हे बदल विकास योजनेत अंतर्भूत करावे लागतील व त्यानुसार विकास योजना नकाशे / विकास योजना अहवाल नव्याने तयार करुन घ्यावे लागतील. त्याकरीता बराच कालावधी लागेल.

(क) महासभेने उक्त ठरावाद्वारे १६ नविन बदल प्रारुप विकास नियंत्रण नियमावलीत सुचविलेले असून ते सर्व बदल विकास नियंत्रण नियमावलीत अंतर्भूत करावे लागतील व त्याकरीता नियमावली नव्याने Redraft करावी लागेल आणि त्यासाठी बराच कालावधी लागेल.

(ड) कोविड-१९ मुळे कोरोनाचा प्रसार रोखण्यासाठी शासनाने दि.१८/०३/२०२० पासून कार्यालयीन कर्मचाऱ्यांची कमाल उपस्थितीवर बंधने आणली असून दि.१८/०३/२०२० पासून कमाल ५%, दि.०२/०५/२०२० पासून कमाल १०%, दि.०१/०६/२०२० पासून कमाल १५% व दि.०१/०९/२०२० पासून कमाल ३०% एवढे बंधन आणल्याने नगर रचना विभागात दि.०१/०९/२०२० पासून केवळ ३०% कर्मचारी उपलब्ध आहेत व या कर्मचाऱ्यांची नेमणूक देखील उक्त कोविड-१९ चा प्रसार रोखण्यासाठी विविध अत्यावश्यक सेवांसाठी वर्ग करण्यात आलेली आहे व त्यामुळे नगर रचना विभागात विकास योजनेच्या कामासाठी पुरेसे तांत्रिक कर्मचारी उपलब्ध नाही.

(इ) कोविड-१९ विषाणूच्या अनुषंगाने दि.२३/०३/२०२० ते दि.३०/११/२०२० पर्यंत टाळेबंदी (Lockdown) कालावधी असून सदर कोविड-१९ चा विद्यमान प्रसार पाहता सदर कालावधी पुढे देखील शासनाद्वारे वाढविण्याची शक्यता नाकारता येत नाही.

(फ) महानगरपालिकेच्या एप्रिल-मे-२०२० मधील संभाव्य निवडणूका विचारात घेवून त्याअनुषंगाने प्रारुप प्रसिध्द मतदार यादी तपासणीचे (प्रत्यक्ष पडताळणी करुन) काम नगर रचना विभागामार्फत फेब्रु-मार्च २०२० मध्ये करावे लागले.

(ग) लॉकडाऊनकाळात शासनाच्या दि.०२/०५/२०२० च्या आदेशानुसार आणि Mission Begin अंतर्गत Previous Work साठी संबंधित आस्थापनांना परवानगी देण्याचे काम मोठ्या प्रमाणात नगर रचना

| | |
|---|---|
| | विभागामार्फत करावे लागले व त्यासाठी केवळ ५ ते १०% उपलब्ध कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत आणि सहकार्याने पार पाडावे लागले. सदर काम दि.३०/०६/२०२० पर्यंत कार्यरत होते.<br><br>०५. सबब, वर नमूद परिच्छेद ०४ मधील (ब) व (क) नुसार कार्यवाही करण्यासाठी परिच्छेद ०४ मधील (ड) ते (ग) वरील कारणास्तव काही कालावधी नगर रचना विभागास लागणार असल्याने सदर विकास योजना प्रसिध्द करण्यासाठी १ वर्षाच्या मुदतवाढीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यासाठी नगर रचना अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगर रचना, नवी मुंबई महानगरपालिका यांनी संदर्भ क्र. २ अन्वये टिपणी सादर केलेली आहे. सदर टिपणीचे अवलोकन केले असता व वर नमूद केलेल्या कारणास्तव १ वर्षाच्या मुदतवाढीच्या प्रस्तावास (अर्थात दि.१९/१२/२०२० ते दि.१८/१२/२०२१ पर्यंत) या ठरावाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.<br>०६. सदर ठरावानुसार पुढील कार्यवाही करण्यास व त्यानुसार उक्त मुदतवाढीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यास देखील या ठरावाअन्वये मान्यता देण्यात येत आहे. शासनाच्या दि.०१/१२/२०१६ च्या आदेशानुसार सदर मुदतवाढीचा प्रस्ताव मंजूर करण्याचे अधिकार शासनाने संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केलेले असल्याने सदर मुदतवाढीचा प्रस्ताव त्यांच्याकडे पाठविण्याची कार्यवाही नगर रचना अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगर रचना, नवी मुंबई महानगरपालिका यांनी तात्काळ करावी. तसेच लॉकडाऊनचा कालावधी शासनाद्वारे संपुष्टात आणल्यानंतर अधिक विलंब न करता उक्त विकास योजनेबाबत सर्व वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन जनतेकडून सूचना / हरकती मागविण्यासाठी उक्त विकास योजना तातडीने प्रसिध्द करण्याची कार्यवाही नगर रचना अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगर रचना, नवी मुंबई महानगरपालिका यांनी करावी, असेही आदेशित करण्यात येत असून, प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह मा. प्रशासक यांची मान्यता देण्यात यावी." |
| निर्णय : | **ठराव करण्यात येतो की,**<br><br>**नवी मुंबई महानगरपालिकेची प्रारुप विकास योजना २०१८-२०३८ महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २६(१) अन्वये उक्त विकास योजना प्रसिध्द करण्यासाठी १ वर्ष मुदतवाढीचा प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत, सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले आहे.**<br><br>**त्यानुसार विषय क्रमांक ०४ ठराव क्रमांक ३४२, प्रस्तावित केल्याप्रमाणे** नवी मुंबई महानगरपालिकेची स्थापना दि.०१/०१/१९९२ पासून झालेली असून या महानगरपालिका क्षेत्रासाठी सिडकोची तत्कालीन विकास योजना, जी शासनाने दि.१८/०८/१९७९ व दि.१८/०१/१९८० रोजी मंजूर करुन दि.०१/०३/१९८० पासून अंमलात आलेली आहे, ती लागू आहे. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात उक्त विकास योजनेतील २९ महसूली गावे व या विकास योजनेत समाविष्ट नसलेले केवळ अडवली-भुतावली हे एकमेव महसूली गाव असे एकूण ३० महसूली गावे समाविष्ट आहे.<br>०२. सबब, या २९ गावांसाठी लागू असलेली मंजूर विकास योजना सुधारित करणे व नव्याने अंतर्भुत केलेल्या अडवली-भुतावली या गावांची विकास योजना नव्याने हाती घेणे याबाबत (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त विकास योजना" असा करण्यात येईल) निर्णय महानगरपालिकेने त्यांचेकडील ठराव क्र. १८५०, दि.२४/०७/२०१७ अन्वये घेवून त्याबाबतचा इरादा हा महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात येईल) कलम २३(१) (कलम ३८ सह) अन्वये दि.१४/१२/२०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आलेला होता. सदर इरादा हा शासन राजपत्रात देखील दि.१५/१२/२०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आलेला होता. उक्त अधिनियमाच्या कलम २६(१) अन्वये उक्त विकास योजना हि तयार करुन, कलम २३(१) अन्वये इरादा झाल्याच्या तारखेपासून २ वर्षात अधिक शासनाकडून १ वर्षाची मुदत वाढ मंजूर करुन घेणे यांसह कमाल ३ वर्षापर्यंत, कलम २६(१) अन्वये जनतेकडून सूचना / हरकती मागविण्यासाठी प्रसिध्द करणे आवश्यक आहे. उक्त अधिनियमाच्या १४८अे मध्ये शासनाने दि.१४/०९/२०२० च्या अधिसूचनेद्वारे केलेल्या सुधारणेनुसार पाहता "**या अधिनियमाचे प्रकरण दोन, तीन, चार आणि पाच खालील कोणत्याही विकास आराखडा, क्षेत्रीय आराखडा, किंवा योजना यांचा कालावधीची गणना करतील असा / असे कालावधीची कोणत्याही न्यायालयाच्या आदेशामुळे गेलेला कालावधी [2](किंवा भारताच्या निवडणूक आयोगाच्या किंवा राज्य निवडणूक आयोगाच्या आचारसंहितेचा अंमलबजावणीचा कालावधी. किंवा देशामध्ये किंवा राज्यामध्ये उद्भवणाऱ्या कोणत्याही महामारीच्या किंवा साथीच्या रोगांच्या फैलावास किंवा आपत्तीजन्य परिस्थितीस प्रतिबंध करण्याकरीता, भारत सरकारने, किंवा, यथास्थित, राज्य सरकारने केलेल्या कोणत्याही मार्गदर्शक तत्वांच्या किंवा टाळेबंदी उपाययोजनांचा अंमलबजावणीचा कालावधी) यातून वगळण्यात येईल.)**". सदर सुधारणा दि.२३/०३/२०२० पासून पुर्वलक्षी प्रभावाने अंमलात आलेली आहे.<br>०३. उक्त कलम १४८अे ची तरतूद पाहता, उक्त विकास योजनेतील वैधानिक कार्यवाही करावयाच्या कालावधीमधून लोकसभा निवडणूक, २०१९ चा आचारसंहिता कालावधी (दि.१०/०३/२०१९ ते दि.२६/०५/२०१९ – ७९ दिवस), विधानसभा निवडणूक, २०१९ चा आचारसंहिता कालावधी (दि.२१/०९/२०१९ ते दि.२७/१०/२०१९-३७ दिवस) व कोविड-१९ विषाणू टाळेबंदीचा कालावधी २५३दिवस (दि.२३/०३/२०२० ते दि.३०/११/२०२० पर्यंत) असा एकूण ७९ + ३७ + २५३ = ३६९ दिवसांचा कालावधी वगळणे आवश्यक आहे. हा ३६९ दिवसांचा कालावधी विचारात घेतला तर कलम २६(१) अन्वये उक्त विकास योजना हि २ वर्षाच्या आत म्हणजे दि.१५/१२/२०१७ पासून २ वर्षे म्हणजेच दि.१५/१२/२०१९ पासून पुढे ३६९ दिवस म्हणजेच दि.१८/१२/२०२० पुर्वी प्रसिध्द करणे आवश्यक आहे. त्याशिवाय शासनाच्या पुर्वमंजूरीने दि.१८/१२/२०२० च्या पुढे १ वर्षे म्हणजेच दि.१८/१२/२०२१ पुर्वी जनतेकडून सूचना / हरकती मागविण्यासाठी प्रसिध्द करणे आवश्यक आहे.<br>०४. वर नमूद केल्याप्रमाणे दि.१८/१२/२०२० पुर्वी सदर विकास योजना हि कलम २६(१) अन्वये प्रसिध्द करणे खालील कारणास्तव शक्य होणार नाही, असे नगर रचना अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगर रचना, नवी मुंबई महानगरपालिका यांनी संदर्भ क्र. २ अन्वये निदर्शनास आणून दिलेले आहे.<br>(अ) महासभेचा उक्त विकास योजना प्रसिध्दीसाठी अर्थात जनतेकडून सूचना / हरकती मागविण्यासाठी प्रसिध्द करण्यासाठीचा मंजूर ठराव महापालिका सचिव यांच्याकडून नगररचना विभागास |

| | |
|---|---|
| | दि.२८/०२/२०२० रोजी प्राप्त झालेला आहे.<br>(ब) महासभेने उक्त ठरावाद्वारे मोठ्या प्रमाणात अर्थात एकूण २२६ नविन बदल विकास योजनेत सुचविलेले असून हे बदल विकास योजनेत अंतर्भूत करावे लागतील व त्यानुसार विकास योजना नकाशे / विकास योजना अहवाल नव्याने तयार करुन घ्यावे लागतील. त्याकरीता बराच कालावधी लागेल.<br>(क) महासभेने उक्त ठरावाद्वारे १६ नविन बदल प्रारुप विकास नियंत्रण नियमावलीत सुचविलेले असून ते सर्व बदल विकास नियंत्रण नियमावलीत अंतर्भूत करावे लागतील व त्याकरीता नियमावली नव्याने Redraft करावी लागेल आणि त्यासाठी बराच कालावधी लागेल.<br>(ड) कोविड-१९ मुळे कोरोनाचा प्रसार रोखण्यासाठी शासनाने दि.१८/०३/२०२० पासून कार्यालयीन कर्मचाऱ्यांची कमाल उपस्थितीवर बंधने आणली असून दि.१८/०३/२०२० पासून कमाल ५%, दि.०२/०५/२०२० पासून कमाल १०%, दि.०१/०६/२०२० पासून कमाल १५% व दि.०१/०९/२०२० पासून कमाल ३०% एवढे बंधन आणल्याने नगर रचना विभागात दि.०१/०९/२०२० पासून केवळ ३०% कर्मचारी उपलब्ध आहेत व या कर्मचाऱ्यांची नेमणूक देखील उक्त कोविड-१९ चा प्रसार रोखण्यासाठी विविध अत्यावश्यक सेवांसाठी वर्ग करण्यात आलेली आहे व त्यामुळे नगर रचना विभागात विकास योजनेच्या कामासाठी पुरेसे तांत्रिक कर्मचारी उपलब्ध नाही.<br>(इ) कोविड-१९ विषाणूच्या अनुषंगाने दि.२३/०३/२०२० ते दि.३०/११/२०२० पर्यंत टाळेबंदी (Lockdown) कालावधी असून सदर कोविड-१९ चा विद्यमान प्रसार पाहता सदर कालावधी पुढे देखील शासनाद्वारे वाढविण्याची शक्यता नाकारता येत नाही.<br>(फ) महानगरपालिकेच्या एप्रिल-मे-२०२० मधील संभाव्य निवडणूका विचारात घेवून त्याअनुषंगाने प्रारुप प्रसिध्द मतदार यादी तपासणीचे (प्रत्यक्ष पडताळणी करुन) काम नगर रचना विभागामार्फत फेब्रु-मार्च २०२० मध्ये करावे लागले.<br>(ग) लॉकडाऊनकाळात शासनाच्या दि.०२/०५/२०२० च्या आदेशानुसार आणि Mission Begin अंतर्गत Previous Work साठी संबंधित आस्थापनांना परवानगी देण्याचे काम मोठ्या प्रमाणात नगर रचना विभागामार्फत करावे लागले व त्यासाठी केवळ ५ ते १०% उपलब्ध कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत आणि सहकार्याने पार पाडावे लागले. सदर काम दि.३०/०६/२०२० पर्यंत कार्यरत होते.<br>०५. सबब, वर नमूद परिच्छेद ०४ मधील (ब) व (क) नुसार कार्यवाही करण्यासाठी परिच्छेद ०४ मधील (ड) ते (ग) वरील कारणास्तव काही कालावधी नगर रचना विभागास लागणार असल्याने सदर विकास योजना प्रसिध्द करण्यासाठी १ वर्षाच्या मुदतवाढीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यासाठी नगर रचना अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगर रचना, नवी मुंबई महानगरपालिका यांनी संदर्भ क्र. २ अन्वये टिपणी सादर केलेली आहे. सदर टिपणीचे अवलोकन केले असता व वर नमूद केलेल्या कारणास्तव १ वर्षाच्या मुदतवाढीच्या प्रस्तावास (अर्थात दि.१९/१२/२०२० ते दि.१८/१२/२०२१ पर्यंत) या ठरावाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.<br>०६. सदर ठरावानुसार पुढील कार्यवाही करण्यास व त्यानुसार उक्त मुदतवाढीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यास देखील या ठरावाअन्वये मान्यता देण्यात येत आहे. शासनाच्या दि.०१/१२/२०१६ च्या आदेशानुसार सदर मुदतवाढीचा प्रस्ताव मंजूर करण्याचे अधिकार शासनाने संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केलेले असल्याने सदर मुदतवाढीचा प्रस्ताव त्यांच्याकडे पाठविण्याची कार्यवाही नगर रचना अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगर रचना, नवी मुंबई महानगरपालिका यांनी तात्काळ करावी. तसेच लॉकडाऊनचा कालावधी शासनाद्वारे संपुष्टात आणल्यानंतर अधिक विलंब न करता उक्त विकास योजनेबाबत सर्व वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन जनतेकडून सूचना / हरकती मागविण्यासाठी उक्त विकास योजना तातडीने प्रसिध्द करण्याची कार्यवाही नगर रचना अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगर रचना, नवी मुंबई महानगरपालिका यांनी करावी, असेही आदेशित करण्यात येत असून, प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह मा. प्रशासक यांची मान्यता देण्यात येत आहे. |

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**नगरसचिव**
**नवी मुंबई महानगरपालिका**

**सही/-**
**(अभिजीत बांगर)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**नवी मुंबई महानगरपालिका**